**वादीकरीता साक्षीदार क्र.१**

**<u>प्रतिवादी क्र.४, ६ व ९ करीता पुढील उलटतपास विधिज्ञ श्री. एम. यु. तळीखेडकर यांच्यावतीने शपथेवर सुरु</u>**

१४. शब्बीर महेबूब शेख व बशीर महेबूब शेख यांना मी ओळखतो. ते दोघेही हयात नाहीत. त्यांचे वारस आहेत. शब्बीर महेबूब शेख व बशीर महेबूब शेख यांच्याकडून प्रतिवादी कलीमोद्दीन पाशामियॉ हाश्मी यांनी भूमापन क्र. ७४/५८/ब मधील ३ हेक्टर १५ आर पैकी ८६ आर क्षेत्र खरेदी केले आहे हे म्हणणे खरे आहे. त्यान्वये खरेदीखत नोंदणी क्र. १३३५/१९९६ दिनांक ११/०७/१९९६ रोजी नोंद झाले व त्या आधारे प्रतिवादी कलीमोद्दीन पाशामियाँ हाश्मी त्या ८६ आर क्षेत्राचे मालक झाले हे म्हणणे खरे आहे. खरेदीखत नोंदणी क्र. १३३५/१९९६ आधारे फेरफार क्र. ६१९ मंजूर झाला हे मला माहीत नाही. त्यान्वये प्रतिवादी कलीमोद्दीन पाशामियाँ हाश्मी यांच्या नावची नोंद ७/१२ उताऱ्यास लागल्याचे मला माहीत नाही. फेरफार क्र. ६१९ च्या विरुध्द मी अपील दाखल केले नाही.

प्रश्न:- शब्बीर महेबूब शेख व बशीर महेबूब शेख यांच्या वारसांना तुम्ही प्रस्तूत दाव्यात पक्षकार केले आहे काय?

उत्तर:- ते मला आमचा काही संबंध नाही, येत नाही असे म्हटल्यामुळे मी त्यांना पक्षकार केले नाही.

१५. प्रतिवादी कलीमोद्दीन पाशामियाँ हाश्मी आणि प्रतिवादी फैयाजोद्दीन महेबूब हाश्मी हे दोघे सख्खे भाऊ आहेत हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादी कलीमोद्दीन पाशामियाँ हाश्मी आणि प्रतिवादी फैयाजोद्दीन महेबूब

हाश्मी यांचे वडील महेबूब साहेब हाश्मी हे सन १९४५ साली मयत झाले हे मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.४ पाशामियाँ हे थारले असून प्रतिवादी फैयाजोद्दीन हे धाकटे आहेत हे म्हणणे खरे आहे. वडील मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र.४ पाशामियाँ हे कुटुंबाचे प्रमुख झाले व त्यामुळे भूमापन क्र. ७४/५८/अ मधील ९ एकर व भूमापन क्र. ७४/५८/ब मधील १ एकर जमीनीचे ते कुटुंबकर्ता नात्याने मालक झाले हे म्हणणे खरे आहे. कुटुंबकर्ता म्हणून प्रतिवादी क्र.४ पाशामियाँ यांच्या नावे फेरफार क्रमांक २६३ मंजूर झाल्याचे मला माहीत नाही. फेरफार क्रमांक २६३ मंजूर होत असताना प्रतिवादी फैयाजोद्दीन लहान होते हे मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.४ पाशामियॉ हाश्मी, प्रतिवादी कलीमोद्दीन आणि प्रतिवादी फैयाजोद्दीन हे माझे भावकीत नसून ते खरेदीदारही नाहीत. प्रतिवादी फैयाजोद्दीन सज्ञान झाल्यानंतर त्यांच्या व प्रतिवादी क्र.४ पाशामियॉ हाश्मी यांच्यामध्ये वाटप झाले हे म्हणणे खरे आहे. त्या वाटणी आधारे फेर क्रमांक ५४४ हा दिनांक २१/०१/१९८१ रोजी मंजूर झाला हे मला माहीत नाही. त्यावाटपात भूमापन क्र. ७४/५८/अ मधील १ हेक्टर ६२ आर व भूमापन क्र. ७४/५८/ब मधील १ एकर जमीन प्रतिवादी क्र.४ पाशामियॉ हाश्मी यांच्या हिस्स्यास गेली हे मला माहीत नाही. प्रतिवादी फैयाजोद्दीन हाश्मी यांच्या हिस्स्यास भूमापन क्र. ७४/५८/अ मधील २ हेक्टर ०२ आर जमीन गेली हे म्हणणे खरे आहे. वाटपाप्रमाणे जो–तो प्रत्यक्षात काबीज आहे हे म्हणणे खरे आहे.

१६. प्रतिवादी फैयाजोद्दीन हाश्मी यांचा ७/१२ उतारा मी दाव दाखल करत असताना पाहिला होता. प्रतिवादी फैयाजोद्दीन हाश्मी यांनी

त्यांच्या नावचे क्षेत्र सन २०१२ मध्येच विक्री केले हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादी फैयाजोद्दीन हाश्मी यांनी सन २०१२ मध्येच जमीन विक्री केल्याचे मला माहीत नव्हते. प्रतिवादी फैयाजोद्दीन हाश्मी यांच्या नावावर कसलेच क्षेत्र नाही हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी क्र.४ पाशामियाँ हाश्मी, प्रतिवादी क्र.६ कलीमोद्दीन हाश्मी, प्रतिवादी क्र.९ फैयाजोद्दीन यांचा व माझा काही संबंध नाही हे म्हणणे खरे नाही. दावा मिळकतीशी माझा कसलाच संबंध नाही हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी क्र.४ पाशामियाँ हाश्मी, प्रतिवादी क्र.६ कलीमोद्दीन हाश्मी, प्रतिवादी क्र.९ फैयाजोद्दीन यांना त्रास देण्याच्या उद्देशाने मी खोटा दावा दाखल केला हे म्हणणे खरे नाही.

**<u>प्रतिवादी क्र. ५ व १२ ते १६ करीता उलटतपास विधिज्ञ श्री. पी. जी. जवळगेकर यांच्यावतीने सुरु</u>**

१७. माझ्या आजोबाचे नाव लालमियाँ होते. लालमियाँ यांच्या वडीलांचे हसन लालमियाँ होते. हसन लालमियाँ यांना एक मुलगी नामे ताहेराबी व तीन मुले नामे उस्मान हसन, चॉद हसन व फैयाज हसन हे आहेत. माझे आजोबा लालमियाँ यांना तीन मुले नामे महमद लालमियाँ, मेहतून लालमियाँ व हसन लालमियाँ हे आहेत. हसन लालमियाँ यांना जाऊ येथे भूमापन क्र. ७४/५८/ब आणि भूमापन क्र. ७/अ मध्ये जमीन होती. हसन लालमियाँ यांना सुमारे ३० ते ३२ एकर जमीन होती. हसन लालमियाँ यांनी ती जमीन त्यांच्या मुलांमध्ये वाटप करुन दिली नव्हती. हसन लालमियाँ यांचे सर्व हयात वारस दाव्यास पक्षकार केलेले आहेत. दस्तगीर हा माझ्या मामाचा मुलगा आहे. आम्ही तीन भाऊ नामे उस्मान

हसन, चॉद हसन व फैयाज हसन असे आहोत. मी दावा केवळ उस्मान यांच्याच विरुध्द केला आहे. प्रतिवादी उस्मान यांच्या व्यतिरिक्त माझा इतर कोणत्याही प्रतिवादीविरुध्द कसलाच वाद नाही. प्रतिवादी उस्मान यांची जमीन वगळता इतर प्रतिवादीच्या जमिनींशी माझा काहीही संबंध नाही. माझे वडील मयत होत असताना त्यांना किती जमीन होती हे मला माहीत नाही, साक्षीदार स्वत:हून पुढे सांगतात त्यावेळी मी दोन वर्षे वयाचा होतो. महेतुल्लामियाँ हे मोठे चूलते आहेत. त्यांना वारस नाहीत.

१८. मी माझ्या हिस्स्याची ५ गुंठे शेती अखलाबी दौला पठाण यांना विक्री केली आहे. माझ्या दोन भावांनीही अखलाबी यांना प्रत्येकी ५ गुंठे जमीन विक्री केल्याचे मला माहीत नाही. अखलाबी दौला पठाण यांना विक्री केलेल्या जमिनीशी माझा काहीही संबंध राहिला नाही हे म्हणणे खरे आहे. दाव्यात समाविष्ठ मिळकती कोणत्या आहेत ते मी सांगू शकतो. भूमापन क्र. ७४/५८/ब व भूमापन क्र. ७/अ मधील जमीनी मी दाव्यात समाविष्ठ केली आहे. त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही जमीन मी दाव्यात समाविष्ठ केली नाही. भूमापन क्र. ७४/५८/ब मधील जमिनीची मी चतु:सीमा सांगू शकत नाही. भूमापन क्र.७/क मधील माझ्या क्षेत्रात जिल्हा परिषदेची शाळा आहे. त्या शाळेस आमची संमती नाही. मी दाव्यात जिल्हा परिषदेस पक्षकार केलेले नाही. भूमापन क्र. ७४/५८/ब आणि भूमापन क्र.७/क च्या दक्षीणेस व पुर्वेस ओढा, पश्चिमेस सरकारी रस्ता व उत्तरेस पाशामियाँ शेख यांची शेती आहे. भूमापन क्र.७/अ च्या पुर्वेस सरकारी रस्ता, पश्चिमेस गुडूसाब चाँद मुल्ला, दक्षिणेस बीदर–लातूर रस्ता व उत्तरेस विश्वनाथ भोरगडे यांची शेती आहे. माझ्या वडीलास कसलीच शेती नव्हती हे

म्हणणे खरे नाही. प्रतिवादी उस्मान यांनी शेती विक्री केली किंवा कसे हे मला माहीत नाही. प्रतिवादी उस्मान यांनी शेती विक्री केली असे जे दाव्यात लिहिले आहे ते बरोबर आहे. भूमापन क्र. ७४/५८/ब मध्ये १८ एकर काही गुंठे क्षेत्र असून त्यात सहा सहहिस्सेदार आहेत. ते सहा सहहिस्सेदार नामे उस्मान हसन, चॉद हसन, फैयाज हसन, ताहेराबी हसन, शब्बीर हसन, बशीर हसन आहेत, साक्षीदार पुढे स्वत: सांगतात, शब्बीर हसन आणि बशीर हसन हे दोघेही मयत आहेत. आम्हा सर्वांची जमीन एकाच ठिकाणी आहे. शब्बीर हसन यांना दोन मुले असून मुलींबाबत मला माहीत नाही. बशीर हसन यांना एक मुलगा असून मुलींबाबत मला माहीत नाही. शब्बीर हसन आणि बशीर हसन यांच्या पत्नी हयात आहेत. त्या या दाव्यास पक्षकार नाहीत. भूमापन क्र. ७४/५८/ब व भूमापन क्र. ७/अ च्या ७/१२ उताऱ्यांवर आमच्या कुटुंबातील कोणत्याच व्यक्तीचे नाव नाही हे म्हणणे खरे आहे. भूमापन क्र. ७/७/क च्या ७/१२ उताऱ्यावर उस्मान शेख यांच्या नावे ३७.५९ आर क्षेत्र आहे हे म्हणणे खरे आहे. ७/१२ उताऱ्यांवरील आमच्या कुटुंबातील व्यक्तीचे नावे काढून टाकले हे मला सन २०१२ पासून माहीत आहे. आमची नावे काढून टाकल्यामुळे आम्ही कोठेही तक्रार केली नाही. प्रतिवादी क्र.१० पाशामियाँ यांनी प्रतिवादी क्र.११ विठोबा सुतार यांच्याकडून जमीन खरेदी केली आहे. प्रतिवादी क्र.१० पाशामियाँ यांनी प्रतिवादी क्र.१२ सलीम, प्रतिवादी क्र.१३ दौला, प्रतिवादी क्र.१४ दत्तू आणि प्रतिवादी क्र.१५ इसाक यांना जमीन विक्री केली हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादी क्र.१० पाशामियाँ यांनी प्रतिवादी क्र.१२ सलीम, प्रतिवादी क्र.१३ दौला, प्रतिवादी क्र.१४ दत्तू आणि प्रतिवादी क्र.१५ इसाक यांना जमीन

विक्री केल्यापासून ते त्याचे मालक व कब्जेदार आहेत हे म्हणणे खरे आहे. खरेदीआधारे प्रत्येकाचे फेरफार मंजूर झाले आहेत हे म्हणणे खरे आहे.

१९. जाऊ गावी माझे घर आहे. ते घर माझ्या वडीलांचे आहे. त्या घरास दाव्यात समाविष्ठ केले आहे किंवा कसे हे मला माहीत नाही. त्या घरात मी राहतो. प्रतिवादी उस्मान हे वडीलांच्या खुल्या जागेत राहतात. प्रतिवादी चॉंद हे जाऊ गावी जाणे–येणे करत असतात. जाऊ येथील आमचे घर सध्या पक्के आहे. मी जन्मल्यापासून जाऊ येथे राहतो. दाव्यात किती मिळकतींचा उल्लेख केला ते मला माहीत नाही. दावा मिळकत कोणी विक्री केली व कोणी खरेदी केली हे मला माहीत नाही हे म्हणणे खरे आहे. माझे भांडण केवळ प्रतिवादी उस्मान यांच्यासोबत आहे. इतर प्रतिवादींशी माझा संबंध नाही.

२०. दिनांक ०१/१०/२०१८ रोजी काय झाले ते मला माहीत नाही. दिनांक ०१/१०/२०१८ रोजी माझे कोणाबरोबरही भांडण–तंटा व वाद झाले नाहीत.

२१. माझे वडील, आजोबा व पंजोबा यांच्या नावाचा उल्लेख असलेला जुना महसूल अभिलेख मी दाखल केला आहे.

**मध्यान्हामुळे पुढील उलटतपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2026.06.29 15:44:33 +0530

( रवि वि. पांडे )

दिनांक २९/०६/२०२६.

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर निलंगा,
जिल्हा लातूर

**<u>मध्यान्हानंतर प्रतिवादी क्र. ५ व १२ ते १६ करीता उलटतपास विधिज्ञ श्री. पी. जी. जवळगेकर यांच्यावतीने शपथेवर पुन्हा सुरु</u>**

२२. दावा मिळकतीचे मी सर्व ७/१२ उतारे पाहिले आहेत. दावा मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यांवरील लोकांची नावे व त्यांचे क्षेत्र मला माहीत नाही. त्यांची नावे ७/१२ उताऱ्यांवर कशी आली याची मला माहिती नाही. कोणती मिळकत कोणाच्या नावे आहे हे मला माहीत नाही. दावा मिळकतींच्या ७/१२ उताऱ्यावर असलेल्या नावाच्या लोकांच्या क्षेत्राच्या चतु:सीमा मला माहीत नाहीत. प्रतिवादी उस्मान यांच्याविरुध्द मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. प्रतिवादी उस्मान व तलाठी यांनी संगणमत करुन ७/१२ उताऱ्यावर बदल केले म्हणून मी त्यांच्यावर फौजदारी कार्यवाही केली नाही. प्रतिवादी उस्मान यांनी ज्या–ज्या लोकांना मिळकत विक्री केली त्यांची खरेदीखते मी दाखल करु शकतो. प्रतिवादी उस्मान यांनी ज्या–ज्या लोकांना मिळकत विक्री केली त्यांची खरेदीखते दाव्यात दाखल नाहीत हे म्हणणे खरे आहे. प्रतिवादी उस्मान यांनी ज्या–ज्या लोकांना मिळकत विक्री केली त्यांची खरेदीखते मी पाहिलेली नाहीत. प्रतिवादी उस्मान यांनी कोणती जमीन कोणास विक्री केली हे मला माहीत नाही.

२३. मी राशनकार्डवर धान्य घेतो. आम्हा भावांचे राशनकार्ड विभक्त आहेत. आम्ही सर्व भाऊ विभक्त राहतो. आम्ही भाऊ एकत्र राहत नाहीत.

प्रश्न:– तुम्ही, उस्मान व चॉंद एकत्र राहत असल्याचे खोटे सांगत आहात?

उत्तर:– आम्ही भाऊ मागील सुमारे ३५ वर्षांपासून विभक्त राहत आहोत.

२४. माझ्या सरतपासातील मजकूर खोटा आहे हे म्हणणे खरे नाही. माझ्या सरतपासातील मजकूर मला माहीत हे म्हणणे खरे नाही. मी खोट्या माहिती आधारे दावा दाखल केला हे म्हणणे खरे नाही. दावा दाखल करण्याचे मला अधिकार नाही हे म्हणणे खरे नाही. मी दावा मिळकतीत हिस्सा मिळण्यास हक्कदार ठरत नाही हे म्हणणे खरे नाही. मी खोटा दावा दाखल करुन खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD
Date: 2026.06.29 15:44:38 +0530

( रवि वि. पांडे )

दिनांक २९/०६/२०२६. दिवाणी न्यायाधीश, व.स्तर निलंगा,

जिल्हा लातूर